# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 20 January 2026
# Time 01.00 to 01.05 PM
# Language Marathi
# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक २० जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.

****

भारतीय जनता पक्षाचे बारावे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितीन नवीन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आज दिल्लीत भाजप मुख्यालयात पक्षाचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. के लक्ष्मण यांनी नवीन यांच्या नियुक्तीची अधिकृत घोषणा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवीन यांचा सत्कार करण्यात आला. केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह, नितीन गडकरी, माजी अध्यक्ष जे.पी नड्डा यावेळी उपस्थिते होते. नितीन नवीन हे बिहार विधानसभेवर पाच वेळा सदस्य म्हणून निवडून आले आहेत, तसंच बिहार सरकारमध्ये ते गृहनिर्माण आणि कायदा मंत्री होते. सिक्कीम आणि छत्तीसगड सारख्या राज्यांमध्येही त्यांनी महत्त्वाच्या संघटनात्मक जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत.

पंतप्रधान मोदी यांनी यावेळी जगातल्या सर्वात मोठ्या राजकीय पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नवीन यांचं अभिनंदन केलं. गेल्या काही महिन्यांत संघटनेच्या तळागाळापासून ते राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडीपर्यंत संपूर्ण प्रक्रिया शंभर टक्के लोकशाही पद्धतीने पार पडली. आज ही प्रक्रिया योग्य आणि औपचारिकरीत्या पूर्ण झाली असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

****

'मेक इन इंडिया' अभियानामुळे मुंबई–अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाला मोठं बळ मिळत असल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. या प्रकल्पाचं काम सातत्याने प्रगतीपथावर असून, भारताच्या पहिल्या अतिजलद रेल्वे प्रणालीसाठी इलेक्ट्रिक ट्रॅक्शन सक्षम करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचं पाऊल असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. जागतिक स्तरावर सिद्ध झालेल्या हाय–स्पीड रेल्वे तंत्रज्ञानाचा अवलंब करताना देशांतर्गत उत्पादन क्षमतांना चालना मिळत असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. मुंबई आणि अहमदाबाद दरम्यानचा प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सोयीस्कर होणार असून, संपूर्ण मार्गावरील दळणवळण व्यवस्थेत सुधारणा होणार आहे. या प्रकल्पामुळे रोजगार निर्मिती, स्थानिक अर्थव्यवस्था आणि भारतीय उत्पादन क्षेत्राला मोठा फायदा होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

****

स्वित्झर्लंडमध्ये दावोस इथं आयोजित जागतिक आर्थिक परिषदेत कालच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारनं विविध कंपन्याबरोबर विक्रमी साडेचौदा लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूक करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. याअंतर्गत स्वाक्षरी केलेल्या १९ सामंजस्य करारांमुळे विविध क्षेत्रांमध्ये १५ लाखांहून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होण्याचा अंदाज आहे.

****

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण पक्षचिन्हाबाबतच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात उद्या बुधवारपासून अंतिम सुनावणी सुरू होणार आहे. यासोबतच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि घड्याळ चिन्हाबाबतही सुनावणी होणार असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालचं खंडपीठ सलग दोन दिवस अंतिम युक्तिवाद ऐकून घेणार आहेत.

****

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त छत्रपती संभाजीनगर शहरातल्या शासकीय विभागीय ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शनाचं उद्घाटन आज मराठी प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष कुंडलिकराव अतकरे यांच्या हस्ते झालं. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी निरंतर वाचन आवश्यक असून, शासकीय विभागीय ग्रंथालयातल्या ग्रंथांचं दालन सर्वांसाठी खुलं असल्याचं ते यावेळी म्हणाले.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या गंगापूर नगर परिषदेच्या उपनगराध्यपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे अमोल जगताप यांची निवड झाली आहे. आज सकाळी नगराध्यक्ष संजय जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्या सर्वसाधारण सभेत उपनगराध्यक्षांसह दोन स्वीकृत सदस्यांची निवड करण्यात आली.

****

पालघर जिल्ह्यात होणारे वाढवण आणि जिंदाल बंदर रद्द करावे, प्रलंबित वनपट्टे धारकाच्या नावावर करावेत, स्मार्ट मीटरची सक्ती बंद करावी, अशा विविध १२ मागण्यांसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि किसान मोर्चाने काढलेला लाँग मार्च आज जिल्ह्यातल्या मनोर इथं पोहचला आहे. मनोर इथून हा मोर्चा संध्याकाळपर्यंत पालघरला पोहचणार असून, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. डहाणूचे आमदार विनोद निकोले, किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक ढवळे हे या मोर्चाचे नेतृत्व करत आहेत.

****

भंडारा जिल्ह्यातल्या डोंगरी बुजरुक इथं मॅंग्निज खाणीत कामगारांनी कामबंद आंदोलन पुकारलं आहे. कामगार पुरवठा करणार्या कंत्राटदारांने अनेक कामगारांना कामावरुन कमी केलं, तसंच कामगारांचा पगार देखील कमी केल्याने हे आंदोलन करण्यात येत आहे. कामगारांच्या मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरुच ठेवण्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाला उद्या २१ जानेवारीपासून प्रारंभ होत आहे. शहरातल्या मौलाना अबुल कलाम सभागृहात सायंकाळी पाच वाजता हा कार्यक्रम होणार असल्याचं जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयानं कळवलं आहे.

****

सहाव्या खेलो इंडिया हिवाळी स्पर्धांना आजपासून लडाखमधल्या लेह इथं सुरवात झाली. नायब राज्यपाल कविंदर गुप्ता यांच्या हस्ते या स्पर्धेचं उद्घाटन झालं. २१ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातले खेळाडू आईस हॉकी, स्केटिंग या स्पर्धांमध्ये सहभागी होणार आहेत.

****